D:\D\Niyaman 26-27\परिपत्रक 2026-27.docx

**कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे**
**श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केटयार्ड गुलटेकडी पुणे ४११०३७.**

जा.क्र.नियमन/फळेभाजीपाला,उपबाजार/कामगार/५० कि.मर्यादा/१८२६ /२०२६-२७ दिनांक१५ /१० /२०२६

**परिपत्रक**

विषय:- कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कामगारांना ५० किलो वजनाच्यावर भार वाहू न देणेबाबत.

संदर्भ:- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजीचे शासन परिपत्रक

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केटयार्ड गुलटेकडी पुणे ३७ येथील मुख्य बाजार व उपबाजार आवारातील नियमित शेतीमालाच्या ठोक व्यवसाय करणारे सर्व अनुज्ञप्तिधारी आडते, व्यापारी यांना कळविणेत येते की आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने मालाचे चढ उतार अथवा हाताळणी करणाऱ्या कामगारांकडून ५० किलो पेक्षा जास्त मालाची हाताळणी करुन घेण्यात येवू नये असा निर्णय घेतलेला आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने घेतलेला निर्णय व मा.कामगार आयुक्त कार्यालयाच्या हमालांच्या पाठीवरील ओझ्याबाबत/वजनाबाबतच्या सुचना लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ५० किलो वजनापेक्षा जास्त भाराच्या शेतीमालाची चढ उतार न करणेबाबत सुचना देण्यात याव्यात असे मा.पणन संचालक , महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक ३ एप्रिल २०१० च्या पत्रान्वये मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे यांना कळविले होते व मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी त्यांचे कार्यालयाकडील दिनांक ८/६/२०१० रोजीच्या पत्रान्वये बाजार समितीस कळविले होते . त्यानुसार सदर निर्णयाची अमंलबजावणी करणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक १७/०१/२०११ , दिनांक १/०१/२०२२ व दिनांक २६/०२/२०२६ रोजीच्या परिपत्रकाव्दारे सर्व अनुज्ञप्तिधारी आडते, व्यापारी यांना कळविणेत आले होते. तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १५/०४/२०२६ रोजीच्या संदर्भिय परिपत्रकाद्वारे कांदा , बटाटा व इतर व्यवसायामध्ये विविध व्यापाऱ्यांकडे ५० किलो व त्यापेक्षा जास्त वजनाच्या गोण्यांची चढ उतार करणे कामगारांना त्रासाचे होते याकरिता शेतीमालाची गोणीची मर्यादा ५० किलो पर्यत ठेवणेची कार्यवाही करावी असे बाजार समितीस कळविले आहे. त्यानुसार ५० किलोपेक्षा अधिक वजनाच्या गोण्यामधून / पोत्यामधून शेतीमालाची चढउतार होणार नाही याची सर्व अनुज्ञप्तिधारी आडते / व्यापा-यांनी दक्षता घ्यावी व नियमित शेतीमाल कमाल ५० किलो मर्यादेपर्यंतच पॅकींग करून आणणेबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती आपले स्तरावरून करावी असे दिनांक २७/०४/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविले होते.

तरी कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केटयार्ड गुलटेकडी पुणे ३७ येथील मुख्य बाजार व उपबाजार आवारामधील अनुज्ञप्तिधारी आडते/व्यापारी यांना पुनश्च: कळविण्यात येते की, ५० किलोपेक्षा अधिक वजनाच्या गोण्यामधून / पोत्यामधून शेतीमालाची चढउतार होणार नाही याची सर्व अनुज्ञप्तिधारी आडते / व्यापा-यांनी दक्षता घ्यावी. तसेच याबाबत भविष्यात काही परिस्थिती निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील आणि नियमित शेतीमाल कमाल ५० किलो मर्यादेपर्यंतच पॅकींग करून आणणेबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती आपले स्तरावरून करावी व सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. याची नोंद घ्यावी.

सचिव सभापती
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

**प्रत माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव -**
**सर्व संबंधित अनुज्ञप्तिधारी आडते / व्यापारी.**